# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०१/२०२५ (रविवार) सायंकाळ**

---

### घरफोडी करणारे आरोपीतांना अटक

पोस्टे उमरेड:— फिर्यादी नामे— नंदकिशोर नारायण सीरसीकर वय ४२ वर्ष रा. जोगीठाणपेठ ता उमरेड लक्ष्मी भोजनालय ता उमरेड हे दि २५/०१/२०२५ चे ०३/३० वा. ते ०४/०० वा दरम्यान घरीच परीवारासोबत असतानी फिर्यादीचा भाउ नामे कैलास नारायण यास दुकानाचा दरवाजाचे लॉक तोडण्याचा आवाज आला त्याने घराच्या मागील बाजुच्या गेट ने बघण्यासाठी गेला असता ३ ईसम बाईक वर पळुन जाताना दिसले याबाबत लगेच पोस्टे उमरेडला माहिती दिली. उमरेड पोलीसांनी ३ पैकी एक आरोपी नामे—१) राहुल श्रीकृष्ण गायकवाड वय २१ वर्ष रा यशोधरा नगर नागपुर यास मोटार सायकलवर पकडले. बाकी दोघे अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले. फिर्यादीने आपल्या दुकानात जाउन बघीतले असता काउंटरची तोड फोड झाल्याची दिसुन आली व त्यामध्ये अंदाजे १००००/— रू नगदी चोरीस गेल्या आढळुन आले.

सदर गुन्हयाच्या तपासात आरोपीचा शोध घेत असता सदर गुन्हयातील फरार आरोपी पियुष उर्फ दंदु दिपक निमजे वय २९ वर्ष रा. धम्मदीप नगर नागोबा मंदीर जवळ नागपुर व विधीसंघर्ष बालक यांना यशोधरा नगर नागपूर येथुन ताब्यात घेतले. आरोपीतांकडुन गुन्हयात वापरलेली विना क्रमांकाची होंडा शाईन किंमती ४०,०००/—रू., लोखंडी रॉड किंमती ५०/—रू नगदी २११८/—रू. असा एकुण ४२१६८/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे रामटेक :— दिनांक २५/०१/२०२५ रोजी पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे परिसरात पेट्रोलिंग करत असता एका गुप्त बातमिदाराकडुन माहिती मिळाली की किडस कॉलेज जवळ रामटेक येथे वाळु अवैधपणे टिप्परमध्ये लोड केली जात आहे. अशा माहितीवरुन पोलीस स्टाफ घटनास्थळी सदर टिपर क्र एम एच ४० बीजी ९४९१ किंमती २०,००,००० रू याची पाहनी केली असता सदर टीप्पर मध्ये विनापरवाना रेती वाहुन नेतांनी आढळुन आली अंदाजे ०७ ब्रास रेती ६०००रू प्रती ब्रास प्रमाणे एकुण किंमती ४२०००रू असा एकुण २०,४२,०००रू चा माल सदर टीप्पर चालक १) विनोद मंगरू डहाके वय ३० वर्ष रा चिरवा ता मौदा यास टिप्परचे कागदपत्राबाबत विचारले असता त्यांनी कागदपत्र नसल्याबाबत सांगीतले सदर टीप्पर मालक रोशन पाटील वय ४९ वर्ष रा नागपुर याचे सांगन्यावरून सदर चालकाने क्षमतेपेक्षा रेतीची विनापरवाना वाहतुक करीत असतांना मीळुन आल्याने सदर आरोपी यांचे विरूदध कलम ३०३(२), ४९, भान्या सहीता सहक ४८(७), ४८(८) जमीन महसुल ४, २१, ३ खान खनिज सहक १४६, १९६, १७७, ११५ मोटार वाहन अधिनीयम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## बॅटरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना पारशिवनी पोलीसांनी केले अटक

पोस्टे पारशिवनी:— फिर्यादी नामे— अतुल पांडुरंग काळे वय ३७ वर्ष रा. ईटगाव ता. पारशिवनी जि. नागपुर यांचे तोंडी रीपोर्ट वरून दिनांक २३/०१/२५ चे १७/०० वा ते दि २५/०१/२५ चे ०९/०० वा दरम्यान यातील आरोपी ०१) नंदकिशोर उर्फ नंदु पंजाबराव सरवरे वय ३४ वर्ष ०२) ईश्वर रमेश बर्वे वय ३६ वर्ष दोन्ही रा. गुंढरी(वांढे) ता. पारशिवनी ०३) नरेश रमेश वरखडे रा. सोनेगाव ह.मु.ईटगाव ता पारशिवनी यांनी संगणमत करून उभ्या असलेल्या टिप्पर क्रमांक MH 40 BL 7779 चे कंडक्टर साईडचा काच फोडुन केबीन मधील टिप्परला लावलेली Amron कंपनीची तसेच Exide कंपनीची बॅटरी तसेच कॅबिन मध्ये ठेवलेला हायड्रॉलीक जॅक एकुण किमती २६,०००/—रू चा माल चोरून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०३(२), ३(५) बी.एन.एस अन्वये गुन्हा नोंद केला होता.यातील आरोपीतांना पारशिवनी पोलीसांनी दिनांक २५/०१/२०२५ रोजी चे २०.३८ वा. अटक केली आहे. व गुन्हयातील मुद्देमाल जप्त केला आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**